# प्रेसनोट

महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची अधिकाधिक संधी उपलब्ध व्हावी, या हेतूने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी आणि एमबीए व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता ‘Type A’ विद्यार्थ्याकरिता शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अधिवास प्रमाणपत्राची अट विहित केली होती. यामुळे या राज्यातील मूळ विद्यार्थ्यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रमाण वाढावे, हे अपेक्षित होते.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अधिवास प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. त्याचबरोबर एकाच वेळी किंवा अल्प कालावधीत शासकीय यंत्रणेमार्फत मोठया प्रमाणात अधिवास प्रमाणपत्र निर्गमित करणे जिकिरीचे ठरत आहे. या दोन्ही बाजू विचारात घेऊन अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास अन्य पर्यायांचा अवलंब करता येईल किंवा कसे, याबाबत शासन पातळीवर सर्वंकष विचार झाला आणि या चर्चेमध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या हितास प्राधान्य देऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) शैक्षणिक वर्ष २०११-१२ च्या प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असली तरी अधिवास प्रमाणपत्र विद्यार्थ्याकडे उपलब्ध नसल्यास त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर विद्यार्थ्याकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला नसल्यास त्या विद्यार्थ्याने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या विद्यार्थ्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे; तसा शाळा सोडल्याचा दाखला संबंधित विद्यार्थ्याने सादर केल्यास त्यास व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात यावा.

शासनाने वरील निर्णय हा राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणे सुलभ व्हावे, यासाठी घेतला असून भविष्यातही विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित जोपासण्यासाठी शासन कटिबध्द राहील.

-x-x-x-x-x-x-